Receipt (pavti)

71/8962
Wednesday,April 13 ,2022
9:16 AM

पावती

Original/Duplicate
नोंदणी क्रं. :39म
Regn.:39M

पावती क्रं.: 9890 दिनांक: 13/04/2022

गावाचे नाव: गं.भा.पाथर्ली
दस्तऐवजाचा अनुक्रमांक: कलन2-8962-2022
दस्तऐवजाचा प्रकार : विकसनकरारनामा
सादर करणाऱ्याचे नाव: मे. श्रेष्ठ डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रायटर श्री. नरेंद्र कल्याणजी पटेल

नोंदणी फी	रु. 30000.00
दस्त हाताळणी फी	रु. 680.00
पृष्ठांची संख्या: 34	
एकूण:	रु. 30680.00

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे
9:36 AM ह्या वेळेस मिळेल.

Joint Sub Registrar Kalyan 2

बाजार मुल्य: रु.6685346 /-
मोबदला रु.15677500/-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 784000/-

(सही) जी.बी.सातदिवे
सह. दुय्यम निबंधक वर्ग २,
कल्याण क्र. २

1) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.680/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 1204202215965 दिनांक: 13/04/2022
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH000485703202223E दिनांक: 13/04/2022
बँकेचे नाव व पत्ता:

CHALLAN
MTR Form Number-6

GRN	MH000485703202223E	BARCODE		Date	12/04/2022-18:38:25	Form ID	25.2

Department	Inspector General Of Registration	**Payer Details**	
Type of Payment	Stamp Duty Registration Fee	**TAX ID / TAN (If Any)**	
		PAN No.(If Applicable)	AGOPP4061E
Office Name	KLN2_KALYAN 2 JOINT SUB REGISTRAR	**Full Name**	SHRESHT DEVELOPERS
Location	THANE		
Year	2022-2023 One Time	**Flat/Block No.**	SURVEY NO 75 HISSA NO 1 D
Account Head Details	**Amount In Rs.**	**Premises/Building**	
0030046401 Stamp Duty	784000.00	**Road/Street**	GAJBANDHAN PATHARLI
0030063301 Registration Fee	30000.00	**Area/Locality**	TALUKA KALYAN
		Town/City/District	
		PIN	4 2 1 2 0 1
		Remarks (If Any)	SecondPartyName=SHIVANAND SUDAMA CHS LTD~
Total	8,14,000.00	**Amount In Words**	Eight Lakh Fourteen Thousand Rupees Only

DEFACED 814000.00 DEFACED

Payment Details	PUNJAB NATIONAL BANK	**FOR USE IN RECEIVING BANK**			
Cheque-DD Details		Bank CIN	Ref. No.	03006172022041201422	374216263
Cheque/DD No.		Bank Date	RBI Date	12/04/2022-18:40:39	Not Verified with RBI
Name of Bank		Bank-Branch		PUNJAB NATIONAL BANK	
Name of Branch		Scroll No. , Date		Not Verified with Scroll	

Department ID :
NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तासाठी लागु आहे . नोंदणी न करावयाच्या दस्तासाठी सदर चलन लागु नाही .

Mobile No. : 9702958506

THE JOINT SUB-REGISTRAR ... दस्त क्र. 1224 2022 ... 7 ... 37

Challan Defaced Details

Sr. No.	Remarks	Defacement No.	Defacement Date	UserId	Defacement Amount
1	(iS)-71-8962	0000280303202223	13/04/2022-09:16:31	IGR125	30000.00
2	(iS)-71-8962	0000280303202223	13/04/2022-09:16:31	IGR125	784000.00
			Total Defacement Amount		**8,14,000.00**

Print Date 13-04-2022 11:13:40

मूल्यांकन २०२२–२३

मौजे गजबंधन पाथर्ली सर्व्हे नं. ७५/१/ड क्षेत्र ४१८.०६ चौ. मी.

विभाग क्र. ८/३२ १९क

जमिन दर — २४५०० चौ.मी.

बांधकाम दर :— २६६२० चौ.मी.

सदनिकेचा दर :— ६४८०० चौ.मी.

विकसक (६६६.८०–४१७.६६) x२६६२०=६६८५३४६ बा.मु.

सोसायटीच्या हिश्याचे बांधकामाचे मूल्यांकन

A) ४१७.६६ चौ.मी. x १.१ x २६६२० चौ.मी. (बांधकामदर) + 5 टक्के

= रू. १,२८,४१,४१६/—

B) सभासद यांना दुसरीकडे रूम घेण्यासाठी

डिपॉझीट ११५०० x १२ = रू. १,३८,०००/—

C) ४ सभासदानां भाडे ४ x ७५०० x १२ x २ = रू. ७,२०,०००/—

D) ४ सभासदानां भाडे ४ x ९५०० x १२ x २ = रू. ९,१२,०००/—

E) ४ सभासदानां भाडे ४ x ११५०० x १२ x २ = रू. ११,०४,०००/—

F) विकसन शुल्क १,२८,४१,४१६ x २.५ टक्के = रू. ३,२२,०००/—

मूल्यांकन (A+ B+ C+ D+ E+ F) = रू. १,५६,७७,५००/—

मुद्रांक शुल्क :— ७,८४,०००/—

नोंदणी फी :— ३०,०००/—

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II
सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कल्याण
कार्यालय क्र. २
KALYAN-2

क.नं.न.२
दस्त क्र. ८९९२ | २०२२
२ | ३१

Department of Stamp & Registration, Maharashtra			
Receipt of Document Handling Charges			
PRN	1204202215965	**Date**	12/04/2022
Received from SHRESHT DEVELOPERS, Mobile number 0000000000, an amount of Rs.680/-, towards Document Handling Charges for the Document to be registered(iSARITA) in the Sub Registrar office Joint S.R.Kalyan 2 of the District Thane.			
Payment Details			
Bank Name	SBIN	**Date**	12/04/2022
Bank CIN	10004152022041214870	**REF No.**	210219156144
This is computer generated receipt, hence no signature is required.			

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कल्याण क्रमांक २ KALYAN-2

क.ल.न.२
दस्त क्र. ८९६२ | २०२२
३ | ३४

CHALLAN
MTR Form Number-6

GRN	MH000485703202223E	BARCODE		Date	12/04/2022-18:38:25	Form ID	25.2

Department	Inspector General Of Registration	**Payer Details**	
Type of Payment	Stamp Duty Registration Fee	TAX ID / TAN (If Any)	
		PAN No.(If Applicable)	AGOPP4061E
Office Name	KLN2_KALYAN 2 JOINT SUB REGISTRAR	Full Name	SHRESHT DEVELOPERS
Location	THANE		
Year	2022-2023 One Time	Flat/Block No.	SURVEY NO 75 HISSA NO 1 D
		Premises/Building	
		Road/Street	GAJBANDHAN PATHARLI
		Area/Locality	TALUKA KALYAN
		Town/City/District	
		PIN	4 2 1 2 0 1
		Remarks (If Any)	SecondPartyName=SHIVANAND SUDAMA CHS LTD~

Account Head Details	Amount In Rs.
0030046401 Stamp Duty	784000.00
0030063301 Registration Fee	30000.00
Total	8,14,000.00

Amount In Words: Eight Lakh Fourteen Thousand Rupees Only

Payment Details	PUNJAB NATIONAL BANK	FOR USE IN RECEIVING BANK		
Cheque-DD Details		Bank CIN	Ref. No.	03006172022041201427 / 371216263
Cheque/DD No.		Bank Date	RBI Date	12/04/2022-18:40:39 / Not Verified with RBI
Name of Bank		Bank-Branch		PUNJAB NATIONAL BANK
Name of Branch		Scroll No. , Date		Not Verified with Scroll

Department ID :

Mobile No. : 9702958506

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.

सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.

Print Date 12-04-2022 06:40:09

पुनर्विकास करार

आज दिनांक 13 माहे एप्रिल सन २०२२ रोजी लिहून दिला असे.

मे. श्रेष्ठ डेव्हलपर्स तर्फे प्रोपरायटर)
श्री. नरेंद्र कल्याणजी पटेल)
कार्यालयाचा पत्ता : ए-२२, दुसरा मजला,)
भानुनगर बिल्डींग, पी. पी. चेंबर्स च्या समोर,) लिहून घेणार
डोंबिवली (पू.) ता. कल्याण, जिल्हा ठाणे.) प्रथम पक्षी

यांस

शिवानंद सुदामा को ऑप हौसिंग सोसायटी ली.)
ही महाराष्ट्र को-ऑप सोसायटी अँक्ट १९६०)
अन्वये नोंदणी क्रमांक टीएनए / केएलएन / एचएसजी/)
(टीसी) /११०२३/९९-२००० दिनांक ०६/०९/१९९९)
पत्ता : पत्ता : जिजाई नगर, संत नामदेव पथ क्र. ४) दुसरे पक्षी
गावदेवी कॉम्प्लेक्स समोर, डोंबिवली (पू.))लिहून देणार
तालुका कल्याण, जिल्हा ठाणे.

१. श्री. विवेक रमेश पारूंडेकर
२. श्री. सचिन किसन बर्के / श्रीमती.रोहीणीसचिन बर्के
३. श्री.रामदास परशुराम रोकडे /श्रीमती.यशोदा रामदासरोकडे
४. श्रीमती. वंदना मंगल सूर्यवंशी
५. श्री. धिरेंद्र श्यामरथी यादव
६. श्रीमती. अरूणा चंद्रकांत वाणी
७. श्री. चारूता हरिश अळसुंदेकर
८. श्री. हरिश अनंत अळसुंदेकर
९. श्री. परेश यशवंत खानविलकर /श्रीमती.शिल्पा परेशखानविलकर
१०.श्री.प्रविण रमेश पाटील / रमेश भोजू पाटील
११. श्री. नितीन नंदकुमार ढमे /
१२.श्री. गिरीश र. गुप्ता / श्रीमती.संतोष गिरीश गुप्ता
१३ श्री हरिश अनंत अळसुंदेकर / श्री अनंत रघुनाथ अळसुंदेकर

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 कल्याण

दस्त क्र. ८९९२ | २०२२
५ | ३२

कारणे करार लिहून देतात व घेतात तो येणे प्रमाणे

तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका कल्याण, मौजे गजबंधन पाथर्ली येथील कल्याण डोबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व्हे क्र. ७५/१/डक्षेत्र४१८.०६.ही जमिनीची मिळकत व त्या वरील शिवानंद नावाची इमारत लिहून देणार – शिवानंदसुदामा को ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी ली. या गृहनिर्माण संस्थेच्या नावे मालमत्ता पत्रकात दाखल आहे.

सदरहू मिळकतीस चतु:सिमा येणे प्रमाणे

पूर्वेस - जिजाई नगर – अंबिकानगर रस्ता

पश्चिमेस -श्री. धिरेंद्र श्यामरथी यादवयांची मिळकत

दक्षिणेस - लक्ष्मीनिवास इमारत व ओम स्वस्तिक इमारतीची मिळकत

उत्तरेस -शुभ सोसायटी रस्ता

अश्या जमीन व इमारतीस यापुढे सदरहू मिळकत म्हणून संबोधण्यात आले आहे. व सदरहू मिळकत सोबत जोडलेल्या नकाश्या वर लाल रंगाने अधोरेखित केलेली आहे.

सदरहू मिळकत ही, श्री.धिरेंद्र श्यामरथी यादवयांचे मालकीची होती. सदर मिळकत सदर श्री.धिरेंद्र श्यामरथी यादव यांनी दिनांक ३०/१२/१९९६ रोजीच्या कराराने विकासक साईदत्त कनस्ट्रकशन यांनीशिवानंद सुदामा को ऑप हौसिंग सोसायटी ली. ही इमारत बांधली आहे.त्यानंतर सदर विकासक साईदत्त कनस्ट्रकशन यांनीकल्याणमहानगरपालिकेकडूनजरूर त्या बांधकाम परवानग्या प्राप्त करून सदरहू मिळकतीवर तळ मजला अधिक तीन मजले असलेल्या इमारतीचे बांधकाम केले असून अश्या इमारती मध्ये सदनिका धारक हे लिहून देणार यांचे सभासद म्हणून वास्तव्यकरीत आहे. व त्यासाठी येणारे सर्व टॅक्सेस कल्याण डोबिवली महानगरपालिके मध्ये जमा करीत आहे. सदरहू इमारतीतील सभासदांची विगतवार माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये आहे.

सदरहू इमारतीतील सर्व रहिवाशांनी / सभासदांनीशिवानंदसुदामाको-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी ली. (लिहून देणार) ही सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन केली आहे. महाराष्ट्र को-ऑपरेटीव्ह सोसायटी अॅक्ट १९६० चे तरतुदी अन्वये नोंदणी क्रमांक टीएनए/केएलएन/एचएसजी/(टीसी)/ ११०२३ /९९-२००० दिनांक ०६/०९/१९९९ अशी नोंदणी करण्यात आली आहेव संस्थेचे एकूण १२ सभासद आहेत.

सदरहू इमारतीचे बांधकाम आताजुने झालेले आहे. तसेच आवश्यकत्या आधुनिक सुख सोयींची कमतरता आहे. म्हणून नवीन प्रचलित नियमाप्रमाणे सदर मिळकती वरील जुनेइमारतीचे बांधकाम काढून / पाडून सदरहू मिळकतीचा पूर्ण चटई निर्देशांक तसेच बाहेरून इतर मिळकतींचे हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) घेऊन नवीन इमारतीचे बांधकाम करणे व लिहून देणार यांचे पुनर्वसन करणे शक्य आहे परंतु त्यासाठी कल्याण डोबिवली महानगरपालिकेकडून बांधकाम परवानगी मिळविणे, अकृषिक (NA) परवानगी मिळविणे. हस्तांतरणीय विकास हक्क प्राप्त करणे व त्यानुसार नवीन इमारतीचे बांधकाम करणे ही कामे करणे हे संस्थेचे सभासदांना वैयक्तिकरित्याकरणे शक्य नव्हते म्हणून लिहून देणार व त्यांचे सभासदांनी दिनांक १४/०३/२०२१रोजीच्या सर्व साधारण सभे मध्ये इमारतीचे पुर्ननिर्माण करण्याचे नक्की केले व

विकासकांकडून निविधा मागविण्यात आल्या त्यानुसार दिनांक २५/०७/२०२१ रोजी विशेष सर्व साधारण सभा घेऊन सर्व सभासदांची मंजुरी प्राप्त करण्यात आली व त्यानुसार लिहून घेणार यांची निविदा मंजूर करून लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिनांक ०९/०८/२०२१ रोजीचे पत्र देऊन लिहून देणार यांनी दिलेली निविदा मंजूर असल्या बाबतचे पत्र दिलेले आहे. लिहून देणार यांना लिहून घेणार यांची निविदा योग्य वाटल्याने सदर विकसकास नेमण्याकरिता उपनिबंधक सहकारी संस्था कल्याण, तालुका कल्याण यांचे कडे पत्र दिलेले आहे व सदर कार्यालयातून लिहून घेणाऱ्यास पुनर्विकासाचे विकासक म्हणून निवड करण्यास मान्यता बाबतचे पत्र हे लिहून देणार यांनी स्व: खर्चाने प्राप्त करण्याचे आहे.

सदरहू मिळकतीवर पुनर्विकास करण्यासाठी कल्याण डोबिवली महानगरपालिकेच्या प्रचलित नियमानुसार प्राप्त होणारा FSI तसेच लिहून घेणार यांनी स्व:खर्चाने हस्तांतरित विकास हक्क प्राप्त करून बांधकाम परवानगी प्राप्त करणे व इतर आवश्यक ती सर्व कामे करण्याबाबतचेसर्व हक्क व अधिकार हे लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना सदर करार अन्वये दिलेले आहे. लिहून घेणार हे सदरहू मिळकतीवर कल्याण डोबिवली महानगरपालिकेच्या प्रचलित नियमानुसार आवश्यक त्या सर्व मंजुरी व दाखले प्राप्त करून सदरहू मिळकतीवर पुनर्विकास करणार आहे व सदरहू मिळकतीवर पुनर्विकास करण्याबाबतचा मोबदला म्हणून सदरहू मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या नवीन इमारती मध्ये लिहून देणार यांच्या सध्याच्या सभासदांच्या ताब्यातील मालकीच्या सदनिकांच्या वापरात असलेल्याकारपेट क्षेत्रा एवढे क्षेत्र मालकी हक्काने सभासदास विनामूल्य दरात देऊन पुन:स्थापित करून देण्याचे लिहून घेणार यांनी मान्य केले. तसेच सध्याच्या सभासदांना देय मोबदला (नवीन इमारतीतील निवासी सदनिका) दिल्या नंतर उर्वरित सदनिका व गाळे लिहून घेणार यांना त्यांच्या मर्जी प्रमाणे विकण्याचा व मोबदला स्विकारण्याचे हक्क लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिलेले आहे. लिहून घेणार यांनी देऊ केलेला मोबदला हा लिहून देणार यांस मान्य असल्याने व सदरहू व्यवहाराचे विचार विनिमय, सूत्र संचालन व नियंत्रण लिहून देणार यांचे तर्फे करण्याचे मान्य केल्या मुळे प्रस्तुत चा करार करण्यात येत आहे. त्याच्या अटी व शर्ती येणेप्रमाणे

१. तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका कल्याण, मौजे गजबंधन पाथर्ली येथील कल्याण डोबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व्हे क्र. ७५/१/ड क्षेत्रफळ ४१८.०६ चौ मी. ही जमिन मिळकत व त्या वरील जुन्या इमारतीस यापुढे सदरहू मिळकत म्हणून संबोधण्यात आले आहे व सदरहू मिळकत सोबत जोडलेल्या नकाश्या वर लाल रंगाने अधोरेखित केलेली आहे व अशी मिळकत लिहून देणार यांनी लिहून घेणार यास सर्व कायदेशीर तरतुदींचे पालन करून विकसित करण्यास देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे.

७	३२

२. सदरहू मिळकतीवर असलेली जुनी इमारत पाडून प्रचलित नियमानुसार सदरहू मिळकतीचा पूर्ण चटई निर्देशांक तसेच बाहेरील अन्य मिळकतींचे हस्तांतरणीय विकास हक्क व इतर लाभ व फायदे प्राप्त करून कल्याण डोबिवली महानगरपालिके कडून आराखडे व नकाशे मंजूर करून नवीन बहुमजली इमारतीचे बांधकाम करण्यासाठी सध्य स्थितीतील लिहून देणार यांच्याकडून त्यांच्या ताब्यातील जुन्या इमारतीतील सदनिकांचा ताबा घेऊन नवीन इमारतींचे बांधकाम

करणे व लिहून देणार यांच्याकडे सध्य स्थितीत असलेल्या सदनिकांच्या कारपेट क्षेत्रा येवढेच क्षेत्र मालकी तत्त्वावर लिहून देणार यांच्या सध्याच्या सभासदास विनामूल्य दरात देऊन त्यांचे पुनर्वसन करून देण्याचे लिहून घेणार यांनी मान्य केले आहे. तसेच ज्या सदस्यांना अधिक क्षेत्र हवे असेल तेव्हडे क्षेत्र ह्या करारात इतरत्र नमूद केलेल्या दराने मालकी हक्काने मिळेल असे लिहून घेणार यांनी मान्य केले आहे. तसेच सध्याच्या रहिवाशी सभासदांना पार्किंगची व्यवस्था ही (Open Parking) ओपनपार्किंग मध्ये विनामूल्य करून देण्यात येईल. जरसभासदांना स्टील्ट पार्किंग क्षेत्र पाहिजे असल्यास सदर स्टील्ट पार्किंग लिहून घेणार यांचे कडून त्यांनी निश्चित केलेल्या रक्कमेचा भरणा करून घेण्याची आहे हे लिहून देणार यांना मान्य व कबूल आहे.

३. उभय पक्षात असे ठरले आहे की, सदरचा करार झाल्यापासून सहा महिन्याच्या कालावधीत लिहून घेणार यांनी सदरहू मिळकतीबाबत कल्याण डोबिवली महानगरपालिके कडून बांधकाम परवानगी प्राप्त करावयाची आहे. हे लिहून घेणार यांस मान्य व कबूल आहे तसेच सदर बांधकाम परवानगी प्राप्त करण्याकरिता आवश्यक ते सर्व कागदपत्रे हे लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना देण्याचे आहे.

४. उभय पक्षात असे ठरले आहे की, नंतर सध्याच्या सभासदांना देय मोबदला दिल्यानंतर उर्वरितनिवासी सदनिका व अनिवासी गाळे लिहून घेणार यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे विकण्याचे व मोबदला घेणे, या सर्व गोष्टी लिहून घेणार यांनी स्व: खर्चाने व स्वताच्या जबाबदारीवर करण्याच्या आहे. व त्याप्रमाणे नवीन इमारतीचे बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या प्राप्त झाल्यांनतर लिहून घेणार यांनी लिहून देणार व त्यांच्या सध्याच्या सभासदांना वैयक्तिकरित्या महाराष्ट्र स्थावर संपदा (विनिमयन व विकास) कायदा २०१६ (महारेरा) अथवा त्यावेळी जो कायदा व अधिनियम असेल त्या अन्वये संबंधित सदनिकांसाठीचे वितरण करार लिहून व नोंदवून देण्याचे आहे व त्यासाठी लागणारे मुद्रांक शुल्कसदस्यांना देणाऱ्या जादा क्षेत्रासाठी किंवा खरेदी केलेल्या कोणत्याही क्षेत्रासाठी देय असेल, नोंदणी फी व इतर खर्च हा लिहून देणार यांनी करण्याचा आहे.

दस्त क्र. ६६९२/२०२२

५. सर्व पक्षांमध्ये असे ठरले आहे की, लिहुने देणार यांच्या सध्याच्या सभासदांपैकी कोणत्याही व्यक्तीने / सभासदांने त्यांना प्राप्त होणाऱ्या सदनिका कारपेट क्षेत्रा पेक्षा वाढीव कारपेट क्षेत्र मागितल्यास अश्या व्यक्तीस / सदनिका धारकास रक्कम रुपये १०,०००/- चौ.. फुट दराने असे जास्तीतचे कारपेट क्षेत्रा करिता लिहून घेणार यास मोबदला द्यावा लागेल अशा सदनिकेच्या निश्चित होणाऱ्या क्षेत्रात वापरण्या योग्य क्षेत्राचा समावेश आहे व राहील व अशा स्वरूपाचा आराखडा मंजूर करते वेळी सदनिकेची रचना व त्या करिता ठरविण्यात येणाऱ्या डिझाईन (DESIGN) चे सर्व हक्क लिहून घेणार यांच्याकडेच असतील व त्याचा वापर लिहून घेणारे प्रचलित कायदा अंतर्गत चालू असलेल्या धोरण प्रमाणे करतील.

६. सदर नियोजित इमारतीचा सुधारीत आराखडा (PLAN) कल्याण डोबिवली महानगरपालिके कडून मंजूर झाल्यांनतर व मिळकतीवर प्रत्यक्ष विकसित कार्य सुरु केल्यापासून २४ महिन्याच्या कालावधीत मिळकतीवर मंजूर आराखड्या प्रमाणे बांधकाम पूर्ण करतील व बांधकाम पूर्ण झाल्यावर लिहून देणार व त्यांच्या सभासदांच्यासाठी निश्चित होणाऱ्या निवासी सदनिकांचा ताबा देतील व त्याकरिता लिहुन देणार हे सदनिकांचे वितरण त्यांच्या सभासदांना करतील व अशा वितरणामध्ये लिहून घेणार यांचा कोणताही समावेश व दखल असणार नाही. व त्याची तोशीसहीत लिहून देणार हे लिहून घेणार यांना लागू देणार नाहीत. उभय पक्षात असे ठरले आहे की, लिहून घेणार यांना संपूर्ण जुन्या इमारतीचा व सदनिकांचा खुला व मोकळा ताबा मिळकत विकसित करण्याकरिता बांधकाम परवानगी तसेच अनुषंगिक परवानग्या व दाखले प्राप्त झाल्यापासून १ महिन्याच्या आत लिहून घेणार यांना देण्यात येईल सर्व सभासदांचा खुला व मोकळा ताबा प्राप्त करून देण्याची जबाबदारी ही लिहून देणार यांचीच आहे हे लिहून देणार यांना मान्य व कबूल आहे.

७. सदरहू मिळकतीवरील इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याच्या कालावधी सहा वर नमूद केल्याप्रमाणे २४ महिन्याचा नक्की करण्यात आला असला तरी काही नैसर्गिक आपत्ती, युद्ध, मिळकतीच्या टायटल (Title) संबंधीचा वाद निर्माण झाल्यास, मिळकती संबंधी कोर्ट स्थगित झाल्यास बाजारात बांधकाम साहित्य तसेच मजुरांची कमतरता झाल्यास लिहून घेणार यांना सदरहू कालावधी सहा महीने वाढवून मिळेल हे देणार यांना मान्य व कबूल आहे.

८. उभय पक्षात असे ठरले आहे की, लिहून देणार यांचे सभासद व्यक्ती हे आज जुन्या इमारतीतील सदनिकांमध्ये वास्थव्य करीत आहे व जुन्या इमारतीतील त्यांच्या सदनिकांचा ताबा व मिळकत विकसित करण्याकरिता बांधकाम परवानगी तसेच अन्य अनुषंगिक परवानग्या व दाखले प्राप्त झाल्यापासून १ महिन्याच्या आत लिहून घेणार यांना देण्यात येईल व त्यानंतर लिहून घेणार यांना जुनी इमारत जमीनदोस्त करून पाडलेल्या बांधकाम साहित्याची विल्हेवाट लावण्याचे हक्क व अधिकार असतील.

९. जुन्या सदनिकांचा ताबा दिल्यांनतर नवीन सदनिकांचा ताबा मिळेपर्यंत लिहून देणार यांच्या सभासदांची पर्यायी राहण्याची व्यवस्था ही संबंधित सभासदानेच करण्याची आहे परंतु त्या करिता दरमहा लागणारी रक्कम लिहून घेणार संबंधित सभासदास प्रत्येकी त्यांच्या कडे असलेल्या क्षेत्राप्रमाणे म्हणजे १ रूम किचन साठी दरमहा रुपये ७,५००/- व १ बेडरूम हॉल किचन करिता दरमहा रुपये ९,५००/- व २ बेडरूम हॉल किचन करिता दरमहा रुपये ११,५००/- डीपॉझीट पोटी प्रत्येकी ३ महिन्यांचे रक्कम देण्याचे निश्चित केले आहे व अशी रक्कम ही लिहुने घेणार यांनी लिहून देणार यांच्या सभासदांना जे-जे त्यांच्या मालकीच्या सदनिकांचा ताबा लिहून घेणार यांना देतील व त्या वेळी लिहून घेणार हे त्या सभासदांना वर नमूद केल्याप्रमाणे पर्यायी राहण्याची व्यवस्था म्हणून अगाऊ तीन महिन्यांची रक्कम व त्याप्रमाणेच डीपॉझीट रक्कम देण्याचे निश्चित केले आहे हे लिहून देणार यांना मान्य व कबूल आहे. आणि २५ व्या महिन्यापासून १०% भाडेवाड करण्याचे निश्चित केले आहे.

१०.लिहून देणार यांनी संयुक्तरित्या लिहून घेणार यांस सदरहू मिळकतीचा निर्विवाद कब्जा कराराच्या अंशीक पुर्ततेकरीता दिलेला आहे व लिहून घेणार यांना जागेवर जाण्यायेण्याचे व सदरहू मिळकतींची प्रायव्हेट सर्व्हेअर अगर सरकारी कार्यालयाकडून पाहणी व मोजणी करण्याचा पूर्ण हक्क व् अधिकार आहे तसेच सदरहू मिळकतीस लिहून घेणार यांना कुंपण किंवा कुंपणाची भिंत घालण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे व अशी मोजणी करताना किंवा कुंपणाची भिंत बांधताना तसेच इमारतीचे जुने बांधकाम पाडतांना काही कायदेशीर अडचणी किंवा तक्रारी आल्यास किंवाअशा अडचणी किंवा तक्रारी बाबतची नोटीस लिहून घेणार यांस मिळाल्यास लिहून घेणार यांनी त्या ताबोडतोब स्वखर्चाने दूर करतील व त्याची तोशीस लिहून देणार यांस लागू देणार नाहीत. सदरहू मिळकत विकसित करण्याचे व विकसन कार्य पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्या जागेवर त्यांचे प्रतिनिधी अभियंता, वास्तुशिल्पकार, कायदेशीर सल्लागार वगैरे तसेच आर्थिक मदत करणारे प्रतिनिधी मित्र, आप्त नातलग यांना वेळोवेळी जागेवर आणण्याचा व जागेवर विकसनाचे कार्य राबविण्याचा पूर्ण हक्क आहे व राहील त्यास लिहून देणार यांनी कोणतीही हरकत घ्यायची नाही.

१०. आज रोजी लिहून देणार यांचे सभासदांनी त्यांचे ताब्यात असलेल्या खोल्याचा ताबा लिहून घेणार यांच्या हक्कात देण्याचे मान्य केले असले तरी संबंधित सभासदांना नविन नियोजित इमारतीत त्यांच्या मालकी हक्कावर वर नमूद केल्याप्रमाणे सदनिका मिळेपर्यंत त्यांचा सदरहू मिळकतीत मालकी हक्क अबाधित राहणार आहे तसेच लिहून घेणार हे लिहून देणार व त्यांच्या सभासदांच्या सदर हक्कास आच लागू देणार नाहीत. ज्या दिवशी संबंधित लिहून देणार यांना व त्यांच्या सभासदांना त्यांच्या त्यांच्या सदनिकांचा ताबा मिळेल, त्या दिवशी संबंधित लिहून देणार यांचा सदरहू मिळकती वरील मालकी म्हणून हक्क संपुष्टात येवून त्यानंतर सदर सदनिका व गाळयांचा उपयोग ते मालकी तत्वावर करतील. तसेच नंतर त्यांचेवर महाराष्ट्र स्थावर संपदा (विनियमन व विकास) कायदा २०१६ (महारेरा) अन्वये नोंदणी केलेल्या करारांतील अटी बंधनकारक राहतील व त्याकरिता सदनिकांकरिता नियमाप्रमाणे लागणारे मुद्रांक शुल्क व नोंदणी या सर्वांचा खर्च तसेच वस्तु व सेवा कर इतर अनुषंगिक कर यांचा भरणा लिहुन देणार यांनी करण्याचा व सोसण्याचा आहे .

११. उभय पक्षांत असे ठरले आहे सदर मिळकतीवर असलेल्या इमारतीत ज्या खोल्या आहेत अशा खोल्यांना कब्जा व ताबा लिहून देणार यांचे सभासदांनी लिहून घेणार यांना दिल्या नंतर सदरहू मिळकतीवरील इमारत व खोल्या पाडण्याचा व पाडलेल्या इमारतीतील साहित्यांचा विल्हेवाट लावण्याचा व त्यांचा मोबदला स्विकारण्याचा लिहून घेणार यांना पूर्ण हक्क व अधिकार आहे यांस लिहून देणार यांची मान्यता आहे व राहील.

दस्त क्र. CEE2 2019
१०

१२. लिहून देणार असे मान्य व कबुल करतात की, प्रस्तुत करार निष्पादीत केल्यानंतर लिहून देणार तसेच त्यांच्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही सभासदांस त्यांच्या ताब्यातील संरचनेमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बदल, जसे कोणत्याही भागात वाढ करणे, सुशोभिकरण करणे, संरचनेत बदल करणे, अद्यावत करणे असे काहीही करता येणार नाही. तसेच सभासदांच्या ताब्यात असलेल्या निवासी सदनिकां बाबीतील किंवात्यांच्या भागाच्या बाबतील कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीशी कोणत्याही प्रकारचा करार किंवा हितसंबंध निर्माण करणार नाहीत. (उदा. विक्री, हस्तांतरण, गहाण, बक्षीस, दान वगैरे.)

१३. या करारा अंतर्गत लिहून देणार जाहिर व उदघोषीत करतात ते येणे प्रमाणे :

अ) लिहून देणार यांस मालक या नात्याने सदरहू मिळकत विकसीत करण्याकरिता देण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे.

आ) सदरहू मिळकतीसाठी त्यांनी आजपर्यंत कुठल्याही प्रकारचा करार, वचनचिठ्ठी, ताबा, गहाण व इतर कागदपत्रे कुणाच्याही लाभात लिहून दिली नाहीत व् सदरची मिळकत चोख, निर्विवाद व बोजाविरहीत सर्व ऋणबोजेमुक्त अशी आहे.

इ) सदरहू मिळकती संदर्भात अँक्वीझीशन अथवा रिक्वीझीशन संबंधी कुठल्याही प्रकारची नोटीसा आजतागायत लिहून देणार यांना मिळालेल्या नाहीत व सदरहू मिळकतीवर लिहून देणार यांचा निरंतर कब्जा वहिवाट आहे.

ई) सदर मिळकतीत असलेल्या इमारतीत लिहून देणार यांचे सभासद रहात असे पर्यंत व लिहून घेणार यांना ताबा देने पर्यंत लिहून देणार यांच्या संबंधीत सभासदांचे जे काही सोसायटी देय रक्कमा किंवा कल्याण डोबिवली महानगरपालिकेतर्फे आकारण्यात येणारा कर तसेच इलेक्ट्रिकचे बिल, पाणी बिल इतर देयके ही त्यांचे त्यांनी पूर्ण भरून मिळकत पूर्णपणे बोजाविरहीत करून त्यांचा ताबा लिहून घेणार यांना देणे आहे. ताबा दिल्यानंतर तसे आढळून आल्यास त्याचे निराकरण करून देण्याची जबाबदारी लिहून देणार यांची असेल व त्यास ते बांधील आहेत. मात्र सभासदांनी त्यांच्या ताब्यातील सदनिका लिहून घेणार यांच्या ताब्यात दिल्यानंतर नवीन सदनिकेचा ताबा मिळेपर्यंत सर्व कर लिहून घेणार यांनी भरावयाचे आहेत.

उ) लिहून देणार याद्वारे जाहिर करीत आहेत की, त्यांच्या सभासदांच्या ताब्यात असलेल्या सदनिका, इमारत तसेच जमीन मिळकत ही पूर्णपणे बोजेविहरित असुन त्यांनी आज रोजी पर्यंत सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचा अथवा संस्थेचा कर्ज अगर बोजा उचलेला नसुन सदरची मिळकत ही टाच, जाच, जप्ती विहरित निर्विवाद मिळकत असुन तसे कर व देयके न भरल्यास व तसेच आढळून आल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी संबंधीत लिहून देणार व संबंधीत सभासदांचीच आहे व् त्याकरिता जरुर ती ना हरकत / संमतीपत्र लिहून देणार हे लिहून घेणार यांच्या लाभत लिहून व नोंदवून देतील. तसेच सदरच्या सदनिकांत सभासदांशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीचे हक्क व अधिकार नाहीत. सदरहू मिळकत विकसीत करते वेळेस लिहून देनार्र यांच्या तर्फे व् सदनिकांसंबंधी कोणीही हक्क हितसंबंध प्रस्थापित केल्यास त्याचे निराकरण करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी लिहून देणार यांची असून ते लिहून घेणार यांना त्याबाबत पूर्णपणे सुरक्षित ठेवतील त्यांना कोणत्याही प्रकारची आच अथवा नुकसान होऊ देणार नाही अथवा झाल्यास ते देखील भरून देण्याची जबाबदारी त्यांची आहे हे ते मान्य करीत आहेत.

ऊ) सदरहू मिळकतीसाठी कल्याण डोबिवली महानगरपालिकेच्या रोडपासून योग्य व रास्त असा रस्ता आहे.

दस्त क्र. ८९९२ | २०२२

१४. लिहून घेणार यांची सदरहू करारातील हक्कांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सदरहू मिळकतीवर कल्याण डोबिवली महानगरपालिकेकडून विकासकार्याचेउभय पक्षांनी मान्य केलेले नकाशे मंजुर करून विकसित कार्य राबविण्याचे आहे व अशा विकसित कार्याअंतर्गत सदरहू करारात नमुद केलेले लिहून देणार यांना त्यांच्या ताब्यात असलेल्या सदनिकांपोटी वर नमुद केल्याप्रमाणे नवीन सदनिका विनामोबदला मालकी तत्वावर बांधून देण्याच्या आहेत.

१५. लिहून घेणार यांना सदरहू मिळकत योग्यरित्या विकसीत करता यावी त्या योजनेसाठी जरुर ते कागदपत्र अस्सल नकला व माहिती वगैरे लिहून देणार यांची लिहून घेणार यांस द्यावयाची आहे. तसे जे जे कागदपत्र मिळणार नाहीत ते ते मिळण्यासाठी लिहून देणार यांनी सह्या वगैरे देऊन सहकार्य करावयाचे आहे.

१६. सदरहू मिळकतीसंबंधी लिहून घेणार हे वर्तमान पत्रात जाहिर नोटीसा प्रसिध्द करतील त्यास लिहून देणार यांची कोणतीही हरकत राहणार नाही. नोटीसी अंतर्गत आलेल्या तक्रारींचे निवारण लिहून देणार हे स्वखर्चाने दुर करून मिळकत सर्वऋणबोजेमुक्त व बोजेविरहीत करून देतील व त्याची तोशीस लिहून घेणार यांना लागु देणार नाहीत.

१७. सदरहू मिळकतीवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम हे सदरहू मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्याइमारतीचा नकाशा व आराखडा मंजुर झाल्यानंतर व बांधकामासाठी बांधकाम प्रारंभ परवानगी प्राप्त झाल्याशिवाय करण्याचे नाही. हे लिहून घेणार यांना मान्य व कबुल आहे.

१८. सदरहू मिळकतीवर लिहून घेणार यांच्या नांवाचा तसेच बांधकाम योजना दर्शविणारा नामफलक लावण्याचा हक्क लिहून घेणार यांस लिहून देणार यांनी दिला आहे. तसेच लिहून घेणार हे सदर बांधकाम योजने अंतर्गत बांधण्यात येणाऱ्यानिवासी सदनिका लिहून देणार व त्यांच्या सभासदांना देण्यात येणाऱ्यासदनिका व्यतिरिक्त उर्वरित गाळे व सदनिका व इतर क्षेत्र विक्री करण्याचा तसेच विक्रीची किंमत घेण्याचा विल्हेवाट लावण्याचा पूर्ण हक्क व अधिकार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिला आहे त्यासंबंधी होणाऱ्याव्यवहारा अंतर्गत लिहून देणार हे कोणत्याही प्रकारची हरकत घेणार नाहीत.

१९. लिहून देणार संस्थेकडे सध्या जमा असलेली सिंकींग फंड व इतर मुदत ठेवींच्या रुपात जी रक्कम जमा आहे त्या रकमे च्या प्रमाणात नवीन सभासद यांचे कडून रक्कम घेऊन ती संस्थेत जमा करणेची जबाबदारी लिहून घेणार यांनी मान्य केली आहे.

२०. लिहून घेणार यांनी विक्री केलेल्या सदनिकांमध्ये व गाळयामध्ये रहायला व व्यवसाय करण्यास येणारे रहिवासी लिहून देणार यांच्या सोसायटी मध्ये सभासद म्हणुन सहभागी होतील व त्यासाठी लागणारी सर्व कायदेशीर कागदपत्रे व संमती लिहून देणार हे देतील. लिहून घेणार यांनी विक्री केलेल्या सदनिका व गाळयामध्ये रहायला व व्यवसाय करण्यास येणारे रहिवासी हे संस्थेचे सभासद होण्याकरीता सहकारी सोसायटीच्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे असणारी रक्कम लिहून देणार यांना देतील व त्यानंतर लिहून देणार हे अशा रहिवाशास सभासद म्हणुन सामिल करून त्यांना शेअर सर्टिफिकेट देतील.

२१. सदरहू मिळकतीवर प्लॅन पास करून घेण्याचा व त्यात फेरबदल सुधारणा दुरुस्ती करावी लागल्यास त्या दुरुस्तीचा फेरबदलाचा नकाशा तयार करून असा सुधारीत नकाशा मंजूर करून व बांधकाम परवानगी घेण्याचा हक्क लिहून घेणार यांना आहे परंतु अशा सुधारीत नकाशात लिहून देणार यांना देण्यात येणाऱ्यासदनिकांच्या क्षेत्रात काही बदल होत असल्यास लिहून घेणार यांनी लिहून देणार यांची संमती घेण्याची आहे.

२२. उभय पक्षात असे ठरले आहे की, कल्याण डोबिवली महानगरपालिकेने सदरहू मिळकती संबंधी टेनंट एफएसआय / मोडकळीस आलेल्या इमारतीचा एफएसआय किंवा जुन्या इमारतीचे पुनर्विकास करण्याकरीता नियमाप्रमाणे मिळणारा एफएसआय, तसेच बाहेरील मिळकतीचे हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) व स्टेअरकेस एफ.एस.आय. यामुळे प्राप्त होणारे एकूण एफएसआय लिहून घेणार यांनी प्रिमियम भरून प्रथम मंजुर करून मिळकतीवरील पुर्नविकास कार्य सुरु करण्याचे आहे व असे सर्व एफएसआय वापरण्याचे हक्क व अधिकार लिहून घेणार यांना आहे व त्या अंतर्गत लिहून देणार यांना सदर करारात नक्की करण्यात आलेले बांधकाम क्षेत्र मोबदला म्हणुन देण्याचे आहे. परंतु भविष्यात असे विकसित कार्य सुरु असतांना प्रिमियम / फी आणि / अथवा कोणतेही शुल्क न भरता शासनाच्या नियमात किंवा धोरणात काही बद्दल होउन एफएसआय मध्ये वाढ झाल्यास, लिहून घेणार यांना सोईचे वाटल्यास असे वाढीव एफएसआय पैकी जेवढे एफएसआय क्षेत्र त्या नुसार सदर व लागुण मिळकतीवर नकाशा / आराखडा मंजुर करून वापरण्यात येईल त्या एकुण वाढीव मंजुर एफएसआय करीता लिहून घेणार हे लिहून देणार यांना कोणताही मोबदला तसेच बांधकाम क्षेत्र देणार नाहीत हे उभय पक्षांना मान्य व कबुल आहे.

२३. सदरच्या मिळकतीवर कल्याण डोबिवली महानगरपालिकेच्या नियमांनुसार अन्य कुठल्याही मिळकतीचे उड़ता चटई क्षेत्र निर्देशांक / हस्तातंरणीय विकासहक्क (टीडीआर) उपलब्ध झाल्यास ते प्राप्त करून सदरहू मिळकतीवर वापरण्याचे हक्क लिहून घेणार यांस लिहून देणार यांनी दिलेले आहे व त्याअंतर्गत बांधण्यात येणाऱ्यासदनिका व गाळे लिहून घेणार यांना विकण्याचा व मोबदला स्विकारण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे व राहील. वरील सर्व बाबीसाठी लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचेकडून कोणत्याही प्रकारचा जादा मोबदला घेण्याचे नाही हे लिहून देणार यांस मान्य व कबूल आहे.

दस्त क्र. 2222 | २०२२
९३ | ३२

२४. पुनर्विकास योजने अंतर्गत सदरहू मिळकतीवरील बांधण्यात येणाऱ्यानवीन इमारतीचे बांधकाम कल्याण डोबिवली महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार करण्याचे लिहून घेणार हे मान्य करतात व सदर इमारत पूर्ण होऊंनबांधकाम पूर्णतेचा दाखला प्राप्त झाल्यावर पुढील तीन वर्षे पर्यंत सदर इमारतीची निगा लिहून घेणार हे राखतील व अशा कालावधीत बांधकामात काही त्रुटी आढळल्यास त्या ते स्वखर्चाने दुर करून देतील.

AS Alankar

RB Pal Chakrabarty

S.K.Barke

२५. सदरहू मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्याइमारतीतील वास्तुस्वरूपी मोबदल्या अंतर्गत देण्यात येणार्या सदनिकांची लिहून देणार यांच्याकडे लेखी पत्राने नोंद केल्यानंतर उर्वरित सदनिका व गाळे वित्त संस्था, बँक यांचेकडे तारण ठेवणेकरीता लिहुन देणार यांनी लिहून घेणार यांना पूर्ण हक्क व अधिकार दिलेले आहेत व त्या अनुषंगाने लिहून घेणार यांना स्वत:च्या जबाबदारीवर बांधकाम कर्ज घेण्याचा हक्क व अधिकार आहे व राहील व त्याची तोशिस लिहून देणार यांना लागू देण्याची नाही. तसेच सदरहू मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्यासदनिका वगाळ्यांसाठी भावी खरेदीदारांना वित्त संस्था / बँका यांच्या लाभात गहाणख़त करण्याकरिता लिहून देणार यांची कोणतीही हरकत राहणार नाही.

२६. सदरहू मिळकत विकसीत करण्याकरिता जे जे अर्ज करावे लागतील तसेच ज्या ज्या कागदपत्रांवर, प्रतिज्ञापत्रांवर, फार्मवर, हमींपत्रांवर लिहून देणार यांच्या सह्या लागतील त्या त्या सह्या लिहून देणार जरुर पडल्यास विनातक्रार समक्ष हजर राहून देतील तसेच लिहून घेणार यांच्या मार्गदर्शनाखाली व लिहून घेणार यांच्या सांगण्यानुसार जरुर त्या ठिकाणी जाबजबाब, कबुली, निवेदन देऊन सह्या करतील, लिहून घेणार हे अशा प्रकारे जाबजबाब कबुली जबाब वगैरे देण्यास कुठल्याही प्रकारे हयगय, टाळाटाळ, दिरंगाई करणार नाहीत. लिहून देणार असे मान्य व् कबूल करतात की, सदर करारा बरोबरच व सदरहू मिळकतीचे विकासकार्य यशस्वीरीत्या करण्याकरिता, राबवीण्या करीता लिहून देणार हे लिहून घेणार यांचे लाभांत कधीही रदद् न होणारे मुखत्यारपत्र लिहून देतील. सदरमुखत्यारपत्रा अन्वये लिहून घेणार यांना विकासाची कामे करणे, सर्व कायदेशीर कृत्ये, दस्ताऐवज करण्याची परवानगी व अधिकार दिले आहेत, सदर मुखत्यारपत्र हे लिहून घेणार यांना विविध सरकारी व निमसरकारी तसेच महानगरपालिका व् पालिकेच्या सर्व विभागीय अधिकारी यांच्या समोर लिहून देणार यांचे प्रतिनिधी म्हणून विविध कागदपत्रे, अर्ज करार, प्रतिज्ञापत्रे सादर करणे करीता उपयोगात आणायचे आहे.

२७. लिहून घेणार यांस या करारानें प्राप्त झालेले हक्क / अधिकार अन्य कोणासही तबदील करण्याचें हक्क आहेत. लिहून घेणार यांना सदरहू मिळकतीचे विकासन कार्य योग्य, रास्त व सुलभरित्या राबविण्याकरीता जर कोणत्याही व्यक्ती संस्थेबरोबर भागीदारी तत्त्वावर आणि / अथवा जॉईट व्हेंचर बेसीसवर किंवा अन्य प्रकारे विकसन कार्य राबवीण्याचे असल्यास आणि / अथवा लिहून घेणार यांच्या भागीदारी संस्थेत इतर कोणतेही भागीदार घेतल्यास व त्या अनुषंगाने मिळकतीवर विकसन कार्य राबविल्यास लिहून देणार यांची कोणतीही हरकत राहणार नाही. मात्र सदर भागीदार अथवा जॉईट व्हेंचर सोबत विकसन कार्य राबवित असतेवेळी जर आपआपसात मतभेद, भांडणे किंवा इतर काही कारणामुळे बांधकाम, विकासकाम थांबल्यास सर्वस्वी लिहून घेणार यांना ठरविण्यात येईल.

दस्त क्र. CEL-1-2017

S.K. Barke

RS Barke

सदरहू करारात उल्लेख केलेल्या कुठल्याही अटी व शर्तींचा योग्य तो बोध न झाल्यास व शंका निर्माण झाल्यास सदरच्या शंका / तक्रार ही लवाद मार्फ़त उभयपक्षांनी सोडवून घ्यावयाची आहे.

साक्ष

सह्या

SHRESHT DEVELOPERS DOMBIVLI

.....

मे. श्रेष्ठ डेव्हलपर्स तर्फे प्रोपरायटर
श्री. नरेंद्र कल्याणजी पटेल
(लिहून घेणार)

शिवानंदसुदामाको ऑप हौसिंग सोसायटी ली.
संस्थेतर्फे





१. अध्यक्ष PPRokade
श्री.रामदास परशुराम रोकडे



२. मा. सचिव
श्री. चंद्रकांत तुळशीराम वाणी



३. खजिनदार
श्री. हरिश अनंत अळसुंदेकर

THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कल्याण



४. सभासद
श्री. नितीन नंदकुमार ढमे

क.स.नं.२
क्र. ८९९२ | २०२
१५ | ३२



१. श्री. विवेक रमेश पारूळेकर





S.K.Barke

२. श्री. सचिन किसन बर्के

/ श्रीमती.रोहीणीसचिन बर्के RSBarke





RRRokade

३. श्री.रामदास परशुराम रोकडे

/ श्रीमती. यशोदा रामदास रोकडे सौ यशोदा रा रोकडे



४. श्रीमती. ~~चंदना~~ मंगल सूर्यवंशी



DSYadav

५. श्री. धिरेंद्र श्यामरथी यादव



६. श्रीमती. अरूणा चंद्रकांत वाणी



Chalsundkar

७. श्रीमती. चारूता हरिष अळसुंदेकर

श्री & श्र हरिष अनंत अळसुंदेकर



८. श्री. हरिष अनंत अळसुंदेकर

श्री. अनंत एकनाथ अळसुंदेकर





९. श्री. परेश यशवंत खानविलकर

/ श्रीमती.शिल्पा परेशखानविलकर Shkhanvilkar



(10)



१०. श्री.प्रविण रमेश पाटील
/ श्री. रमेश भोजू पाटील

(11)



११. श्री. नितीन नंदकुमार ढमे

(12)




(12)



१२.श्री. गिरीश र. गुप्ता
/ श्रीमती.संतोष गिरीश गुप्ता
(लिहून देणार)

1) Vivek. N. Patel
2) Bharat. S. Dhakad



परिशिष्ट अ

सभासदांची यादी

अनु. क्र.	सदनिका धारकांची नावे	क्षेत्र चौ. फुट कारपेट
१	श्री. विवेक रमेश पारूंडेकर	247.95
२	श्री. सचिन किसन बर्के / रोहीणी सचिन बर्के	397.07
३	श्री. रामदास परशुराम रोकडे / श्रीमती. यशोदा रामदास रोकडे	477.52
४	श्रीमती. वंदना मंगल सूर्यवंशी	249.20
५	श्री. धिरेंद्र श्यामरथी यादव	392.78
६	श्रीमती. अरूणा चंद्रकांत वाणी	542.68
७	श्रीमती. चारूता हरिश अळसुंदेकर	247.59
८	श्री. हरिश अनंत अळसुंदेकर	378.03
९	श्री. परेश यशवंत खानविलकर / श्रीमती. शिल्पा परेश खानविलकर	491.75
१०	श्री. प्रविण रमेश पाटील / रमेश भोजा पाटील	249.22
११	श्री. नितीन नंदकुमार ढमे /	376.27
१२	श्री. गिरीश र. गुप्ता / श्रीमती.संतोष गिरीश गुप्ता	446.04

4496.1



De-con Consultants
Architects, Regd, Valuers, Interior Designers & Project Consultants.

TO WHOMSOEVER IT MAY CONCERN

This is hereby certify that the R-zone area of plot for S. No. 75, H No.1D adjoining to 12 M W DP road at Village **Gaj Bandhan Patherli,** Tal. – Kalyan, Dist. Thane is as follows :

1.	Area of Plot	:	418.00 Sq.Mt.
2.	Basic FSI 1.10	:	459.80 Sq.Mt
3.	Premium FSI 0.50	:	209.00 Sq.Mt.
4.	Tota area	;	668.80 Sq.Mt

Place : Kalyan
Date : 23-03-2022

For De-Con Consultants

Varghese John
(Architect

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 ★ KALYAN-2 ★ सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कल्याण कार्यालय क्र. २

क.न.न.२
दस्त क्र. CE52 २०२२
१८ ३२

अहवाल दिनांक : 13/08/2021

गाव नमुना सात
अधिकार अभिलेख पत्रक
[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७]

गाव :- मं.भा.पाथर्ली तालुका :- कल्याण जिल्हा :- ठाणे
भूमापन क्रमांक व उपविभाग : 75/1/ड

भूमापन क्रमांक व उपविभाग 75/1/ड	भू-धारणा पध्दती भोगवटादार वर्ग -1	भोगवटादाराचे नाव				
शेताचे स्थानिक नाव :-			क्षेत्र	आकार	पो.ख.	फे.फा	खाते क्रमांक
क्षेत्र एकक आर.चौ.मी बिन शेती 4.18.06 बिन शेती आकारणी 0.11 जिरायत - बागायत - तरी - वरकस - इतर -		[धिरेंद्र शामरथी यादव	4.18.06	0.11	]	(5885)	[10109], 11219 कुळाचे नाव इतर अधिकार
		शिवानंद सदामा को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.	4.18.06	0.11		(5885)	
एकूण क्षेत्र -							
पोट-खराब (लागवडीस अयोग्य) वर्ग (अ) - वर्ग (ब) -							
एकूण पो ख 0.00.00							
आकारणी 0.00 जुडी किंवा विशेष आकारणी -							
जने फेरफार क्र. (4599),(5663),(5860)							सीमा आणि भूमापन चिन्हे :

गाव नमुना बारा
पिकांची नोंदवही
[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१ यातील नियम २९]

गाव :- मं.भा.पाथर्ली तालुका :- कल्याण जिल्हा :- ठाणे
भूमापन क्रमांक व उपविभाग : 75/1/ड

